# <u>प्रेस नोट</u>

ला.प्र.वि.,वाशिम.
दि.०८.०२.२०२१.

**लोकसेवक श्री.नितेश ओमप्रकाश चौरसीया वय ३० वर्षे, पद रचना सहायक, नगर परीषद मंगरुळपीर यांनी ३५०००/- रुपये लाच मागणी केली बाबत.**

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | लोकसेवक श्री.नितेश ओमप्रकाश चौरसीया वय ३० वर्षे, पद रचना सहायक,नगर रचना विभाग, नगर परीषद मंगरुळपीर |
| लाचेची रक्कम | ३५०००/-रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांना बांधकाम परवानगी देण्यासाठी |
| सापळा अधिकारी | एन.बी. बो-हाडे, पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

थोडक्यात हकीकत-

यातील तक्रारदार यांनी दि. २५.०१.२०२१ रोजी तक्रार दिली की, त्यांना दुकानाचे व घराचे बांधकाम परवानगी देण्यासाठी श्री.चौरसीया रचना सहायक, नगर परीषद मंगरुळपीर यांनी ४५०००/-रुपये लाचेची मागणी केली आहे. सदर तक्रारीवरुन दि.२५.०१.२०२१ व दि.२७.०१.२०२१ रोजी पडताळणी केली असता यातील आलोसे यांनी तक्रारदारास ४५०००/-रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती ३५०००/-रुपये स्विकारण्याची तयारी दर्शविली.

दि.०२.०२.२०२१ रोजी नगर परीषद मंगरुळपीर येथे सापळा लावला असता, सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांना तक्रारदार यांचा संशय आल्याने त्यांनी तक्रारदाराकडुन ३५०००/-रु.लाचेची रक्कम स्विकारली नाही. आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन आरोपी लोकसेवक यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कारवाई मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती,मा.श्री.अरुण सावंत अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, श्री. एस.व्ही.शेळके पोलीस उप अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, अंमलदार पोहेकॉ नितील टवलारकर, पोना अरविंद राठोड, व चापोकॉ नाविद शेख यांनी केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम कडुन सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते कि, शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क करावा.

संपर्क-

दुरध्वनी क्रमांक ०७२५२/२३५९३३,
टोल फ्रि.नं.१०६४

(एन.बी.बो-हाडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.